लघुवाद न्यायालय, मुंबई
लोकमान्य टिळक मार्ग, धोबी तलाव, मुंबई - ४०० ००२

दुरध्वनी क्र. ०२२–२२०८८७००/२२०८८७४९
Website-http : // ecourts.gov.in/small-cause
Email : scc-mumbai@bhc.gov.in

# जाहीर दरपत्रक

लघुवाद न्यायालय, मुंबई या न्यायालयाच्या धोबी तलाव, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई – ४०० ००२ येथील मुख्य कार्यालय तसेच वांद्रे शाखा येथील न्यायिक अधिकारी तसेच कार्यालयासाठी उपयोगी वस्तु खरेदी करण्यासाठी दरपत्रके मागविण्यात येत आहेत. सदर वस्तुंची यादी सोबत परिशिष्ट 'अ' नुसार देण्यात आली आहे.

तरी इच्छुक दरपत्रकधारकांनी आपले दरपत्रक **मोहोरबंद लखोटयात** त्या लखोटयाच्या वरच्या भागावर मोठया अक्षरात **"न्यायिक अधिकारी व कार्यालयासाठी उपयोगी वस्तु खरेदीसाठीचे दरपत्रक"** असे लिहुन त्या **"प्रबंधक, लघुवाद न्यायालय, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई– ४०० ००२"** यांच्याकडे **दिनांक २० जुलै, २०२४, सायंकाळी ५.००** वाजेपर्यंत किंवा तत्पूर्वी पोहोचतील अशा पध्दतीने पाठवाव्यात. तद्नंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही. सदर जाहीर दरपत्रकाची सविस्तर माहिती या न्यायालयाच्या शासनाच्या websites http:// districts.ecourts.gov.in/india/maharashtra/mumbai-smallcause-court/tender. संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**जाहीर दरपत्रक स्विकृत करण्याचा अथवा रद्द करण्याचा/नाकारण्याचा अंतिम अधिकार हा मा. मुख्य न्यायाधीश, लघुवाद न्यायालय, मुंबई यांचा असेल.**

10/07/2024

लघुवाद न्यायालय, मुंबई }
}
मुंबई :– १० जुलै, २०२४ }

( अतुल ग. राणे )
अप्पर प्रबंधक
Additional Registrar
Court of Small Causes
Mumbai 400 002

# परिशिष्ट अ

| अ. कं. | वस्तु | मुख्य शाखा संख्या (नग) | वांद्रे शाखा संख्या (नग) | एकुण संख्या | वस्तुंचा तपशील |
|---|---|---|---|---|---|
| १. | लहान आकार असलेली प्लॅस्टिकची कचराकुंडी (५ लीटर) (सेलो) | ५० नग | ५० नग | १०० नग | १. ५ लीटर क्षमता असलेले<br>२. गोलाकार<br>३. ओपन टॉप<br>४. प्लॅस्टिकची गुणवत्ता चांगली |
| २. | प्लास्टिक बिग कचराकुंडी (चाके असलेली) (१२० लीटर) (निलकमल/सेलो कंपनी) | ०४ नग | .... | ०४ नग | १. १२० लीटर क्षमता असलेले<br>२. सिलेंड्रीकल<br>३. प्लॅस्टिक<br>४. वरील झाकण आवश्यक |
| ३. | प्लास्टिक मोठी कचराकुंडी (६०लीटर) (निलकमल/सेलो कंपनी) | १० नग | ०५ नग | १५ नग | १. ६० लीटर क्षमता असलेले<br>२. सिलेंड्रीकल<br>३. प्लॅस्टिक<br>४. वरील झुलते झाकण आवश्यक |
| ४. | एलईडी व्हाईट टयुबलाईट (सिस्का/फिलिप्स कंपनी) | ५० नग | ०० | ५० नग | २० व्हॅट, आकार— ११०० X २३ X ३३ |
| ५. | वनसाईड एलईडी व्हाईट टयुबलाईट (सिस्का/फिलिप्स कंपनी) | १०० नग | ०० | १०० नग | २० व्हॅट, आकार— ११०० X २३ X ३३ |
| ६. | मोठी ट्युबलाईट (फिलिप्स कंपनी) | १२० नग | ०० | १२० नग | टी—८ टयुब, २२ व्हॅट, लांबी— १२०० मीमी |
| ७. | डायसवरचा लाल रंगाचा कपडा | १५० मी. | ०० | १५० मी. | कापडाची गुणवत्ता चांगली रंग — लाल |
| ८. | चहाचा थर्मास (मिलटन कंपनी) | ५० नग | १५ | ६५ नग | प्रकार— स्टेलनेस स्टील, ५०० मी.ली. |
| ९. | प्लास्टिक फुलझाडू (गाला कंपनी) | ५० नग | २० नग | ७० नग | प्रकार— फेबरीक आणि प्लास्टिक, आकार— XXL |
| १०. | खराटा | ५० नग | ०० | ५० नग | कोकोनट मिन्ट |
| ११. | मॉप (गाला कंपनी) | ५० नग | १५ नग | ६५ नग | मॉप, प्लास्टिक, आकार— ५० X ८ X ३५ से. मी. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १२. | ॲसिड (एक ली.) | ८० नग | ०० | ८० नग | चांगल्या प्रतीचे |
| १३. | वायपर | ५० नग | ०० | ५० नग | उंची ४ फूट, चांगल्या प्रतीचे |
| १४. | टेबल पुसण्याच्या सफेद डस्टर | ५० नग | १०० नग | १५० नग | प्रकार— कॉटन, आकार— २२ X २२ चौरस |
| १५. | फिनाईल (०१ ली.) (सनी कंपनी) | ६० नग | ०० | ६० नग | सनी कंपनीचे असावे |
| १६. | सफेद नॅपकीन | ५० नग | ५० नग | १०० नग | १००% कॉटन, आकार— १६' X २२' |
| १७. | टिशु पेपर्स | २५ पॅकेटस | ३० पॅकेटस | ५५ पॅकेटस | चांगल्या प्रतीचे |
| १८. | घडयाळ (अजंता कंपनी) | ३० नग | २० नग | ५० नग | चांगल्या प्रतीचे आकर — ३२ से.मी. X ३२ से.मी X ३.५ से.मी. रंग — सफेद |
| १९. | हॅण्डवॉश (५ लीटर चे कॅन) | ५० नग | ३० नग | ८० नग | चांगल्या प्रतीचे |
| २०. | पाण्याचा जग (२ ली.) | १० नग | १५ नग | २५ नग | प्रकार — प्लॅस्टिक चांगल्या प्रतीचे |
| २१. | ॲडव्होकेट बॅग (दावे ठेवण्यासाठी लागणारी बॅग) | ३० नग | ०० | ३० नग | आकार — चौकोनी ५७से.मी. X ३६ से.मी X ४० से.मी. रंग — काळा |
| २२. | घडयाळ पेन्सिल सेल मोठे (एव्हरीडे / पॅनासोनिक) | १५० नग | ५० नग | २०० नग | चांगल्या प्रतीचे |
| २३. | ब्लिचींग पावडर (१ किलो) | ८० नग | ०० | ८० नग | चांगल्या प्रतीची |
| २४. | न्यायाधीशांसाठी ॲक्रॅलिक पॅड | १५ नग | १० नग | २५ नग | आकार १८'' X २४'' जाडी— ८ मिमी. पारदर्शक |
| २५. | टेबलवरील कपडा | ५० मीटर | २५ मीटर | ७५ मीटर | रंग मरून |
| २६. | छोटी बादली (५ लिटर) | ३० नग | ०० | ३० नग | प्लास्टीक, गोलाकार, चांगल्या प्रतीची |
| २७. | पायपुसणी | ३० नग | १५ नग | ४५ नग | कॉटन मिडीयम आकाराची |
| २८. | कचरा काढण्याची सुपडी | ५० नग | ०० | ५० नग | चांगल्या प्रतीची मिडीयम आकाराची |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २९. | चहाचे झाकण (टी कोस्टर) | ५० नग | ३० नग | ८० नग | प्लास्टिकचे चांगल्या प्रतीचे |
| ३०. | डांबरगोळया | २०० पॅकेट्स | ०० | २०० पॅकेट्स | चांगल्या दर्जाचे |
| ३१. | स्टीलचे चमचे | ३० नग | २० नग | ५० नग | चांगल्या प्रतीचे |
| ३२. | टेबल बेल | २० नग | १२ नग | ३२ नग | स्टेनलेस स्टील |
| ३३. | शोभेच्या लहान प्लास्टिक कुंडया | २० नग | ०० | २० नग | चांगल्या प्रतीच्या लाहन गोलाकार |

लघुवाद न्यायालय, मुंबई }
मुंबई :— १० जुलै, २०२४ }

10/07/2024

( अतुल ग. राणे )
अप्पर प्रबंधक
Additional Registrar
Court of Small Causes
Mumbai 400 002

# <u>दरपत्रक सुचना</u>

दिनांक : १० जुलै, २०२४

**न्यायिक अधिकारी व कार्यालयासाठी लागणा—या अत्यावश्यक वस्तू खरेदी करण्यासाठी जाहीर दरपत्रके सादर करण्यासंदर्भातील अटी व शर्ती खालीलप्रमाणे :**

| | |
|---|---|
| १. | इच्छुक संस्था/कंपन्यानी आपले दरपत्रक विहित नमुन्यात व वस्तुंच्या पुर्ण माहितीसह मोहरबंद लखोटयात सादर करून त्या लखोटयाच्या वरच्या भागावर मोठया अक्षरात **"न्यायिक अधिकारी व कार्यालयासाठी उपयोगी वस्तू खरेदीसाठीचे दरपत्रक"** असे लिहून ते 'प्रबंधक, लघुवाद न्यायालय, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४००००२' यांच्याकडे दिनांक: २० जुलै, २०२४ पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत किंवा तत्पुर्वी पोहोचतील अशा पध्दतीने पाठवावे. तद्नंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही. |
| २. | सुक्ष्म व लघु, मध्यम उद्योग विकास अधिनियम—२००६ अंतर्गत उत्पादक म्हणून नोंदणीकृत असलेल्या सुक्ष्म व लघु उत्पादक उद्योगांना निविदा शुल्क व बयाना रक्कम भरण्यापासून सूट देण्यात येईल. ज्या दरपत्रकधारकांकडे सदरचे प्रमाणपत्र नसेल तर त्यांना दरपत्रक शुल्क रूपये १८००/— (विना परतावा) व सुरक्षा ठेव रक्कम रूपये ९०००/— (परतावा योग्य व्याजरहीत) या रक्कमेचे डिमांड ड्राफ्ट/पे ऑर्डर देणे गरजेचे आहे. सदर डिमांड ड्राफ्ट/पे ऑर्डर हे ''प्रबंधक, लघुवाद न्यायालय, मुंबई" यांच्या नावे दयावयाचा आहे. |
| ३. | दरपत्रकधारकाने दरपत्रक भरतांना सर्व करासहीत (With G.S.T.) रक्कम नमूद करावी तसेच सर्व करांची रक्कम तपशिलवार दरपत्रकात नमूद करावी. |
| ४. | समितीच्या बैठकीत दरपत्रके उघडण्याच्या वेळेस दरपत्रक धारकांनी आपल्या दरपत्रकात नमुद केलेल्या वस्तुंचे नमुना वस्तु (Sample Piece) पडताळणीसाठी कार्यालयात घेऊन येणे बंधनकारक राहील. |
| ५. | दरपत्रकधारकारने दरपत्रकावर संस्था/कंपनीचे नाव, पत्ता, दुरध्वनी क्रमांक, ईमेल आयडी नमुद करणे आवश्यक आहे. |
| ६. | दरपत्रक धारकांची निवड झाल्यानंतर त्यांच्याशी झालेल्या दरपत्रकातील दरानुसार सदरची खरेदी करण्यात येईल. तसेच ठरलेल्या अटी व शर्तीनुसारच खरेदी होईल आणि निवड झाल्यानंतर वस्तुंचा पुरवठा पुढील १५ दिवसात झाला पाहिजे, १५ दिवसात पुरवठा न झाल्यास सदर निवड |

झालेल्या संस्था/कंपनीला रद्द करण्यात येईल. तसेच निवड झालेल्या संस्था/कंपनीकडून खरेदी केलेल्या वस्त पुरवठा झाल्यावर वस्तु सुस्थितीत आहे की नाही याची तपासणी करून सुरक्षा ठेव रक्कम १० दिवसानंतर परत करण्यात येईल.

७. वस्तुंची गुणवत्ता आणि किंमती पडताळणीचे पूर्ण अधिकार खरेदी समितीला राहतील. वस्तुची किंमत कमी असेल परंतू वस्तूची गुणवत्ता चांगली नसल्यास सदर वस्तु नाकारण्याचे अधिकार खरेदी समितीला राहतील.

८. वस्तुंचा स्वीकार करतांना जर वस्तुमध्ये काही त्रुटी म्हणजेच तुटलेले अथवा वस्तुंचा दर्जा व गुणवत्ता खराब असल्यास, त्या वस्तु परत देण्यात येतील व त्याऐवजी उत्तम दर्जाची नवीन वस्तू पुरवठादारास देणे बंधनकारक राहिल.

९. दरपत्रकधारकाचे/संस्थेचे देयक पारित करण्यासाठी अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई येथे पाठविण्यात येईल व ते मंजूर झाल्यानंतरच दरपत्रकधारकाला रक्कम अदा करण्यात येईल. रक्कम अदा करण्यासाठी देयकासोबत पॅन कार्ड, आधार कार्ड, रद्द धनादेश (Cancelled Cheque) तसेच बॅंकेच्या खाते पुस्तकाचे पहिले पान अथवा अदाता नोंदणी प्रमाणपत्र यांची छायांकीत प्रत देणे अनिवार्य आहे.

१०. दरपत्रक मंजूर झालेल्या संस्थेने सदरच्या उपयोगी वस्तु या न्यायालयातील मुख्य कार्यालयात व वांद्रे शाखा येथे विना वाहतूक शुल्क पोच करावयाचे आहे.

११. मा. मुख्य न्यायाधीश लघुवाद न्यायालय, मुंबई यांनी घेतलेले निर्णय अंतिम राहतील.

10/07/2024

लघुवाद न्यायालय, मुंबई }
}
मुंबई — १० जुलै, २०२४ }

(अतुल ग. राणे)
अप्पर प्रबंधक
लघुवाद न्यायालय, मुंबई

Additional Registrar
Court of Small Causes
Mumbai 400 002